# मी कल्कि

(आशिष महाबळ, १२ अप्रील २००८)
विषय: चित्रपट

माझे नाव कालीकाप्रसाद, वय वर्षे २६. तसे आधुनीक असुनही माझ्या आईवडीलांनी असे जुनाट नाव ठेवले कारण माझ्या जन्माच्या आदल्या  दिवशी दोघांनाही स्वप्नात माझे हे नाव ठेवावे असे कोणीतरी सांगीतले. बहुतेकांचे आपल्या रुपाप्रमाणेच आपल्या नावावरही प्रेम जडते. माझे फार काही वेगळे झाले नाही. लहानपणी मला देखिल स्वप्नात अनेक गोष्टि दिसायच्या पण कधि त्यावर विचार केला नाही. नंतर मात्र जेंव्हा स्वप्नांची यंत्र येवु लागली, Stalker सारखे काही जुने चित्रपट पाहिले, तेंव्हा मात्र मन, सुप्त इच्छा, त्यांचा बाह्य जगाशी संबंध यातील माझे स्वारस्य वाढत गेले. त्याची परिणती माझ्या आजच्या स्थितीत होईल असे मात्र मला स्वप्नातही वाटले न्हवते. पण मी भरकटतोय. आधी तुम्हाला माझ्याबद्दल थोडे अधिक सांगायला हवे.

कॉलेज मध्ये असतांना स्वप्नांचे यंत्र पहिल्यांदा वापरले. आपल्या सुप्त इच्छा आपल्याला जणु मुर्त स्वरुपात त्यातुन अनुभवता येतात. यंत्र लावुन माझा कल्पनाविलास सुरु असतांनाच मधुनमधुन त्यातुनही मझे मन भरकटायचे. स्वप्नातील स्वप्न असल्याप्रमाणे. पण ते जास्त अतर्क्य असण्याऐवजी खऱ्या आयुष्यातील काही संदर्भ मिळायचे. कधी माहीतीचे, तर कधी थोड्याअधिक शोधानंतर सापडणारे. याच अंतरसुप्त खुणांनी मला नाटकं पहायला लावली, चीत्रपट पहायला लावले, जेनेटीक्स चा तसेच तत्वज्ञानाचाही अभ्यास करायला लावला.

हे सर्व करतोच आहोत तर ऑफिशियली करावे म्हणुन मी त्यासंबंधी एका प्रबंधावर काम सुरु केले: ’स्वप्नांचे हार्डवेअर.' मनाच्या गर्तेत शिरता-शिरता मी अनेक शिखरं सर करतोय हे जाणवु लागले. ईतिहास वेगळ्या दृष्टिने पहायला शिकलो. अनेक प्रवर्तनं होवुन गेल्याची जाण झाली.
...
केवळ मनोरंजनाच्या साधनांचाचा आढावा घेतला तर ती देखील उर्वरीत विश्वाला मॅप करता येवु शकतात. गेल्या अनेक दशकांचेच पहा. नाटक (किंवा तमाशा) पुरते मनोरंजन मर्यादित न रहाता मुकपट आले. एकदा फित मिळवली की त्या नटांची गरज नाही. नंतर ध्वनीपटांनी कानांचीही भुक भागवणे सुरु केले. पुढे त्रीमितपट आले. तुमच्या त्वचेवर आणि घाणेंद्रियांवर देखिल आघात् सुरु झाले. इतरांची मने तुमच्या मनात सुप्त इच्छा अप्रकटपणे निर्माण करु लागले. याचीच पुढची पायरी होती मनपट. स्वप्नयंत्र हा त्याचा क्रुड प्रकार.

इन्वेंट युअर् ओन् एन्डींग प्रमाणे मनपट तुमच्या कल्पनेनुसार बदलु शकायचे. तुम्हाला हव्या त्या दिशेने त्यांचा प्रवास व्हायचा. तंत्रज्ञान अजुन विकसीत होवुन तुम्ही काय कल्पना करायला हवी हे तुमच्यावर लादणे देखिल मनपटांद्वारे शक्य होत आहे. मनपट हे राजकारण्यांच्या हातचं मुख्य हत्यार बनणं फार दुर

नाही. हेच ज्ञान वेगवेगळ्या स्वरुपात अनादीकालापासुन उपलब्ध आहे किंवा होतं किंवा असु शकतं हे माझ्या अभ्यासातील संदर्भांवरुन उघड होते. ते पुरातन ज्ञान सहजी कुणाच्या हाती लागु नये म्हणुन त्याचे चार भाग करण्यात आले व चार गटांना वाटुन देण्यात आले. ते कसे हे समजण्याकरता आपल्याला थोडे जेनेटीक्स कडे वळावे लागेल. डीएनए चे मुख्य काम शरीरोपयोगी प्रथीने बनविणे. माकडं व मनुष्य यांच्या डीएनए मध्ये ९९% साधर्म्य असतं हे जवळजवळ सगळ्यांना माहीत असतं. पण अनेकांना हे माहीत नसतं की आपल्या डीएनए मधील ९८% भाग हा प्रथीने बनवीण्याशी संबंधीत नसतो. याला कधीकधी जंक डीएनए असे म्हंटल्या जाते. त्यातील थोड्याफार भागाचा उपयोग काय हे विज्ञानाला आत्ता-आत्ता उमगु लागले आहे. हा जंक डीएनए देखिल पिढ्यानपिढ्या न बदलता पुढे सरकत रहातो. हा जंक डीएनए म्हणजेच ४ बेसेस वापरुन मनांवर विजय मिळवण्याची किल्ली. ही ४ गटांमध्ये विभागुन देण्यात आली. त्यांना मात्र त्याबद्दल माहीत नव्हते कारण तेच तंत्र वापरुन त्यांची मनं त्या बाबतीत कोरी करण्यात आली. किल्लीचा एक भाग मात्र त्यांना मुखोद्गत करायला लावुन त्या रहस्याबद्दलची ज्योत बाह्यतः जागृत ठेवली. या प्रकारे हा एक खेळ किंवा कोडं बनलं. ते जाणुन होते की ठरावीक कालावधीनंतर या कोड्याचा भाग कुणालातरी कोणत्या ना कोणत्या प्रकारे सुटणार आणी मग ते त्याचा अर्धवट का होइना वापर करुन सर्व संपवणार. म्हणुन त्याबाबतचीही तजवीज केल्या गेली.

ती स्थीति एकदा, दोनदा नाही तर अनेकदा आली. मात्र दरखेपेला योग्य वेळी हस्तक्षेप करायला तत्पर आणी सक्षम असा कुणी तयार होता. कधी त्याला शस्त्र उचलावे लागले, कधी अस्त्र वापरल्या गेले तर कधी शांतपणे लोकांना त्यापासुन दुर न्यावे लागले. क्वचित कधी माकड-अस्वलादी प्राण्यांचीही मदत घ्यावी लागली. पण खेळ नेहमीच जारी राहिला. गम्मत म्हणजे पाप-पुण्य, बरे-वाईट, खरे-खोटे, शुद्ध-अशुद्ध असे अनेक यीन-यांग ला शोभतील असे काळे-पांढरे निकश सर्व गोष्टींना लावल्या जात.

पुन्हा एकदा मनपटांमुळे व जेनेटीक्स च्या सहाय्यानी जग त्या किल्लीच्या जवळ पोचले आहे. पण आता थोडाथोडक्या भागाचा संबंध नसुन अख्खे घबाडच हातातोंडाशी आले आहे. छोट्या-छोट्या चक्रांचे वर्तुळ पुर्ण व्हायची वेळ येवुन उभी ठाकली आहे. मी अवतरलो आहे.